# प्रेस नोट

दिनांक : १०/०२/२०२६

नेहा सेतू सेवा केंद्र,ता.लाखनी, जि.भंडारा चे संचालक इ.लो.से श्री सतीश तुळशीराम मोटघरे रा. ता.लाखनी, जि. भंडारा यांचेवर सापळा कारवाई करून लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, भंडारा यांनी लाच रकमेसह ताब्यात घेतले

| | |
|---|---|
| लाच लुचपत प्रतिबंधक विभाग/ घटक | भंडारा |
| स्टेशन डायरी नोंद क्रमांक | लाखनी पोलीस स्टेशन, स्टेशन डायरी नोंद क्रमांक ५३/२०२६ वेळ २१.३५<br>गुन्हा नोंद क्रमांक ५३/२०२६ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | सतीश तुळशीराम मोटघरे (इलोसे) वय २८ वर्षे, पद- नेहा सेतू सेवा केंद्र,ता.लाखनी, जि.भंडारा चे संचालक |
| मागणी केलेली रक्कम | ११,०००/- रूपये |
| स्वीकारलेली रक्कम | ११,०००/- रूपये |
| थोडक्यात हकीगत | यातील तक्रारदार यांचे मुलांना कामगार कल्याणकारी मंडळाकडून शिष्यवृत्ती मिळविण्याकरिता तक्रारदार यांनी नेहा सेतू सेवा केंद्र,ता.लाखनी, जि.भंडारा येथून ऑनलाईन फॉर्म भरलेला होता. सदर वेळी नेहा सेतु केंद्राचे संचालक श्री सतीश तुळशीराम मोटघरे यांनी तक्रारदार यांचेकडून त्यांचे मुलांचे दहावीचे मार्क लिस्ट, डोमासाईल सर्टिफिकेट, आधार कार्ड, कामगार कार्ड, नॉन क्रिमीलेएर सर्टिफिकेट, शाळा सोडल्याचा दाखला अशी मूळ प्रमाणपत्रे स्वत:च्या ताब्यात घेतली होती. तक्रारदार यांना सदर मूळ कागदपत्रांची आवश्यकता असल्याने त्यांनी दिनांक ३०/०१/२०२६ रोजी श्री मोटघरे यांना भेटून कागदपत्रे मागितली असता त्यांनी सदर कागदपत्रे परत करण्यासाठी स्वत:करिता तसेच भंडारा सहायक कामगार आयुक्त कार्यालय येथील अधिकारी यांचेकरिता १२,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याची तक्रार दिनांक ०३/०२/२०२६ रोजी प्राप्त झाली. प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक ०३/०२/२६ रोजी करण्यात आलेल्या पडताळणी वेळी नमूद इलोसे यांनी ११,०००/- रू लाचेची मागणी केली असल्याचे निष्पन्न झाले.<br>त्यावरून दिनांक १०/०२/२६ रोजी ला.प्र.वि भंडारा युनीट यांनी सापळा कारवाईचे आयोजन करून इलोसे श्री सतीश तुळशीराम मोटघरे वय २८ वर्षे, पद- संचालक ,सेतु सेवा केंद्र, लाखनी, भंडारा यांना लाच रकमेसह ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. |

मार्गदर्शन अधिकारी - १.**मा.डॉ दिंगबर प्रधान,पोलीस अधीक्षक**, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,नागपूर परिक्षेत्र

२.**श्रीमती माधुरी बाविस्कर, अपर पोलीस अधीक्षक**, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर परिक्षेत्र

३.**श्री विजय माहुलकर,अपर पोलीस अधीक्षक**, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग नागपूर परिक्षेत्र

लाच लुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते कि, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकासंबंधी काही तक्रार असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, नागपूर परिक्षेत्र येथे संपर्क करावा. संपर्कासाठी :-

पत्ता- १.ला.प्र.वि कार्यालय, सिव्हील लाईन्स, नागपूर
२. ला.प्र.वि कार्यालय, सिव्हील लाईन्स, भंडारा

संकेतस्थळ- acbmaharashtra@mahapolice.gov.in

ईमेल- 1. spacbnagpur@mahapolice.gov.in
2. acbbhandara@gmail.com

टोल फ्रि नंबर - १०६४

मोबाईल नंबर- ८४३२२६१०६४, ९८७०३७६७०६

लॅण्डलाईन नंबर- ०७१८४२५१२६६१

कार्यालय पोलीस उपअधीक्षक
सत्यमेव जयते
अॅन्टी करप्शन ब्यूरो, भंडारा

(डॉ. अरूणकुमार लोहार)
पोलीस उप-अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,भंडारा